


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ९, बुधवार २० नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लंके यांच्या गोटात मोठी इन्कमिंग!

## ■ राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांची माहिती ■ पदाधिकाऱ्यांनी प्रवाहाबरोबर येण्याची भूमिका

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांना पाठिंबा देण्यासाठी मतदारसंघाच्या विविध भागांतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी इन्कमिंग होत असून प्रवाहासोबत येण्याची भूमिका घेत अनेक पदाधिकाऱ्यांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये बिनशर्त पाठिंबा जाहिर केल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांनी सांगितले.**

तरटे म्हणाले, ढवळपुरी गटामध्ये जि.प.च्या कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती बाबासाहेब तरटे तसेच पंचायत समितीचे मा. सदस्य विकास रोहोकले यांनी खा. लंके यांच्यासोबत येण्याचा निर्णय घेत ढवळपुरी गटातील राजकीय गणिते बदलून टाकली. त्यामुळे या गटामध्ये राणी लंके यांना मोठे मताधिक्य मिळणार आहे.

बाबाजी तरटे यांनी सांगितले की, खा. नीलेश लंके यांचा मतदारसंघाशी सततचा संपर्क असल्याने तसेच आमदार म्हणून त्यांनी मोठी विकास कामे राबविल्याने मतदारांचा त्यांच्यावर विश्वास आहे. नागरिकांच्या वैयक्तिक कामांसाठी ते चोवीस तास उपलब्ध असतात. त्यामुळेच लोकसभा निवडणूकीत त्यांच्या विरोधात महाशक्ती असतानाही पारनेर-नगर मतदारसंघात त्यांना मोठे मताधिक्य मिळाले. या मतदारसंघावर विरोधी उमेदवाराने फोकस केलेला असताना तसेच खा. लंके यांची मतदारसंघातील जीवा भावाची यंत्रणा लोकसभा मतदारसंघातील इतर तालुक्यात महिनाभर कार्यरत असतानाही मतदारांनी लंके यांच्यावरच विश्वास टाकला. काही अपवाद वगळले तर बहुतांश बुथवर खा. लंके यांना आघाडी मिळालेली आहे.हीच खा. लंके यांच्या यशाची पावती आहे.

विधानसभा निवडणूकीमध्ये खा. लंके यांची सहकारी आपआपल्या गावागावांत सक्रिय आहेत. प्रत्येक बुथवर विक्रमी मतदान घडवून आणण्यासाठी बुथ कमिटी सदस्यांबरोबच लंके यांच्या यंत्रणेतील सहकाऱ्यांनी नियोजन केले आहे. अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीप्रमाणे लंके समर्थक या निवडणूकीत उतरले असून त्याचे प्रतिबिंब मतमोजणीमध्ये दिसेल असा विश्वास तरटे यांनी व्यक्त केला.



■ भारतीय जनता पक्षाच्या व्हिजेएनटी आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र गावडे तसेच महायुती समर्थक कार्यकत्यांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### महाविकास आघाडी एकसंघपणे प्रचारात

महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते ही उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारात सक्रिय आहेत. निष्ठावान शिवसैनिकांनी गावागावांमध्ये महाविकास आघाडीचा धर्म पाळण्याची भूमिका घेत राणी लंके यांनी मोठे मताधिक्य मिळवून देण्याचा चंग बांधला आहे. पारनेर नगर मतदारसंघाच्या उमेदवार राणी लंके या राज्यात मोठया मताधिक्क्याने विजयी होणाऱ्या उमेदवारांपैकी एक असतील. पारनेर शहरामध्येही प्रचाराचे नेटके नियोजन करण्यात आले असून राणी लंके यांनाच आघाडी मिळवून देण्यासाठी प्रत्येक प्रभागातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आजी माजी नगरसेवक प्रयत्नांची पराकाष्टा करत आहेत.

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### गावे एकवटली !

खा. नीलेश लंके यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघातील प्रत्येक गावांत कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता विकास कामे माग लावली. सुमारे दोन हजार कोटी रूपयांची कामे माग लावत खा. लंके यांनी इतिहास रचला आहे. कोणत्याही नागरीकाचे वैयक्तिक काम असो, त्याची काही समस्या असो त्या दुर करण्यासाठी खा. लंके हे कोणताही भेदभाव न करता पुढाकार घेतात. कोरोना संकटामध्ये ते नागरीकांसाठी धाउन आले. ३३ हजारांहून अधिक कोरोना रूग्णांना त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत केली. याची दखल घेत मतदारसंघातील अनेक गावे राणी लंके यांच्या विजयासाठी एकवटले आहेत. आपसातील मतभेद विसरून केवळ लंके यांच्यासाठी एकत्र आलेले विभिन्न पक्ष, पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी घेतलेल्या या निर्णयाचे मतदारसंघात स्वागत करण्यात येत आहे. राणी लंके यांच्या रूपाने एक महिला आमदार प्रथमच विधिमंडळात जाणार असल्याचे महिला भगिनींमध्येही उत्साह आहे.

**सुवर्णा धाडगे**
राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी, तालुकाध्यक्ष

### शिंगवे नाईक

नगर तालुक्यातील शिंगवे नाईक येथील मा. सरपंच विश्वासराव जाधव, पंचायत समितीचे मा. सदस्य गणेश साळवे यांनी खा. नीलेश लंके तसेच जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रसमध्ये जाहिर प्रवेश करीत महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांना नगर तालुक्यातून मोठे मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली.

### पळवे खुर्द

पळवे खुर्द येथील हरिभाऊ भांडलकर, दत्ता जगताप, पोपट तरटे, बाळासाहेब जाधव, भाग्येश देशमुख यांनी खा. नीलेश लंके तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवार जि प च्या मा. सदस्या राणी लंके यांच्या कामावर प्रभावित होत खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

### वडगांव सावताळ

वडगांव सावताळ येथील सतीश गायकवाड, सचिन जांभळकर, सुरज पवार, पप्पू खोसे, गोरख शिंदे, आदेश साळवे, रोशन भोसले, रणीजीत रोकडे यांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून वडगांव सावळमधून खा. नीलेश लंके यांना भरघोस मताधिक्य देण्याचा निर्धार केला.

### पारनेर शहर

पारनेर शहराचे नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या पुढाकारातून नगरपंचायतचे स्विकृत नगरसेवक शुभम देशमुख यांच्यासह इद्रजित देशमुख, विशाल कावरे, स्वप्नील देशमुख, अभिषेक देशमुख, ऋषीकेश कावरे यांनी त्यांच्या समर्थकांसह खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत राणी लंके यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी पुढाकार घेण्याची ग्वाही दिली.

### भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादीत !

भारतीय जनता पाटच्या महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस अंजना विश्वनाथ बांडे यांनी पती विश्वनाथ बांडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. जानेवारी २०२४ मध्ये महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात यांनी बांडे यांची नियुक्ती केली होती. खा. लंके यांची विकास कामे, कोरोना काळातील त्यांचे काम तसेच एक महिला आमदार होणार असल्याने आम्ही हा निर्णय घेतल्याचे अंजना बांडे यांनी सांगितले. खा. नीलेश लंके यांनी त्यांचे स्वागत केले.

### वडनेर हवेली

वडनेर हवेली येथील मा सरपंच गोरख राऊत, मा. उपसरपंच राजीव सोनुळे, मा. उपसरपंच प्रकाश वाळुंज यांच्यासह योगेश शिंदे, विशाल शिंदे, सुनील भालेराव, रावसाहेब वाळुंज, सुधाकर भालेराव, आबा सोनुळे, रावसाहेब सोनुळे, ओमकार सोनुळे, वैभव सोनुळे, तेजस सोनुळे, अक्षय सोनुळे, सतीश बढे, गोरख भालेराव यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. वडनेर हवेलीमधून राणी लंके यांना मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी घेतला.

### जामगावकरही एकवटले

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाच्या इतिहासात राणीताई लंके यांच्या रुपाने प्रथमच महिला उमेदवार निवडणूक लढवित असल्याने जामगावच्या महिला सरपंच पुष्पाताई माळी यांनी राजकारण बाजूला ठेवत लंके यांना बिनशर्त पाठिंबा दिला. तसेच लंके यांच्या विजयासाठी जामगावकरही एकवटले.

### भाजपाच्या व्हिजेएनटी सेलचे जिल्हाध्यक्षही गळाला !

भाजपाच्या व्हिजेएनटी सेलचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र गावडे, महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांचे विश्वासू सहकारी अरूण गावडे, धनगर समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष शरद गावडे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांचे समर्थक रवि गावडे, समर्थ गावडे, यशकुमार गावडे, भाजपा नेते अमित गावडे, नवनाथ गावडे, मा. ग्रा पं सदस्य पाराजी वाव्हळ, लक्ष्मण पाचारणे, दादा चौधरी, सुनील कपाटे, एकनाथ भालेराव, पटेल मामा यांनी खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत राणी लंके यांच्या विजयासाठी पाठबळ देण्याची ग्वाही दिली.

# अनुभवाच्या शिदोरीवर दाते सर मैदानात!

## ■ चाळीस वर्षांच्या अनुभवाचा लागणार कस ■ राज्य शासनाच्या योजना ■ अजित पवारांचा करीष्मा तसेच महायुतीची संघटीत ताकद ही बलस्थाने

पारनेर : प्रतिनिधी



**गेल्या चाळीस वर्षांपासून पारनेरच्या राजकारणात विविध पदे भुषविलेले जिल्हा परिषदेच्या बांधकाम व कृषि समितीचे सभापती काशीनाथ दाते सर हे यंदाच्या विधानसभा निवडणूकीतील महायुतीचे उमेदवार असून त्यांचा चाळीस वर्षांचा राजकीय अनुभव, निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाने हाती घेतलेल्या लोकप्रिय घोषणा, अजित पवारांचा करीष्मा तसेच महायुतीची संघटीत ताकद ही दाते सरांच्या उमेदवारीची बलस्थाने आहेत.**

एका सामान्य कुटूंबात जन्मलेल्या काशीनाथ दाते यांनी राजकारणात प्रवेश करत विविध पदांवर यशस्वीपणे काम केले आहे. एक शांत व सुसंस्कृत राजकारणी अशी त्यांची छबी आहे. बाजार समितीमध्ये चेअरमन म्हणून काम पाहताना तालुक्यातील एकमेव सहकारी संस्था उर्जितावस्थेत आणण्यासाठी दाते यांनी मोलाची कामगिरी केली. त्यांच्या या कामाची आजही दखल घेतली जाते.

स्व. वसंतराव झावरे, स्व. बाबासाहेब ठुबे, नंदकुमार झावरे, विजय भास्कर औटी या माजी आमदारांसोबत त्यांनी काम केले असून अलिकडच्या काळात पालकमंत्री राधाकृष्ण विखे तसेच मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यासोबतही त्यांनी काम करून विविध विकास कामे मार्गी लावण्याची जबाबदारी पार पाडली आहे. माजी आमदारांसोबत काम करताना निवडणूकीच्या नियोजनाची जबाबदारी काशिनाथ दाते हे नेहमी समर्थपणे सांभाळत. यंदाच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मात्र स्वतः काशिनाथ दाते हे उमेदवार असून त्यांनी या निवडणूकीच्या नियोजनाची जबाबदारी त्यांच्या सहकाऱ्यांवर सोपविली आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारांवर निष्ठा

सुरूवातीपासून काशिनाथ दाते हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारांवर निष्ठा ठेवणारे कार्यकर्ते आहेत. राष्ट्रीय काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्षपदही त्यांनी प्रदिर्घ काळ भुषविले आहे. पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे चालून आली होती. पक्षाचे निष्ठेने काम करत त्यांनी संघटन वाढविण्याची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली आहे.

### अखेर उमेदवारीला गवसणी घातली

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर काशिनाथ दाते यांनी उमेदवारीची मागणी केली होती. मात्र त्यांच्यासह जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, विजय सदाशिव औटी हे देखील उमेदवारीसाठी उत्सुक होते. अजित पवार यांनी सर्वांची बैठक घेत सर्वेक्षणात जो पुढे असेल त्यास उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता. उर्वरीत इच्छुकांचे पुनर्वसन करण्याचा शब्द पवारांनी दिला होता. सर्वेक्षणात एकूण तीन इच्छुकांमध्ये काशिनाथ दाते यांना पसंती आल्याने दाते यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. त्यांना सुजित झावरे यांनी साथ दिली. दुसरे इच्छुक विजय सदाशिव औटी यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अपक्ष उमेदवारी केली. मात्र मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी मध्यस्ती केल्यानंतर विजय औटी यांनीही दाते यांना पाठींबा जाहिर केल्याने अखेरच्या टप्प्यात महायुती एकसंघपणे निवडणूकीस सामारे जात असल्याचे चित्र आहे.

### १५ वर्षानंतर संधी

दाते यांनी सन २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडे उमेदवारीची मागणी केली होती. मात्र उमेदवारीच्या स्पर्धेत त्यांना ती मिळू शकली नाही. त्यानंतर त्यांनी उमेदवारीसाठी प्रयत्न केले नाहीत. अखेर सन २०२४ मध्ये त्यांनी पुन्हा अजित पवार यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून ते निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

### बांधकाम सभापतीपदाच्या माध्यमातून कामे

जिल्हा परिषदेत काम करताना काशिनाथ दाते यांना बांधकाम व पशुसंवर्धन समितीच्या सभापतीपदाची संधी मिळाली. या संधीचे सोने करताना दाते यांनी तालुक्याच्या विविध गावांमध्ये विकास कामे मार्गी लावली. त्यांच्या उमेदवारीसाठी ही कामे जमेची बाजू आहेत.

### भाजपाची खंबीर साथ

महायुतीची उमेदवारी जाहिर होण्यापूर्वीच भाजपाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी महायुतीच्या प्रचारास सुरूवात केली होती. विविध बुथ कमिटयांच्या सदस्यांना सोबत घेत महायुती सरकारने केलेली कामे मतदारांपर्यंत पोहचविण्याचे कामही त्यांनी केले. ही उमेदवारी भाजपाला मिळावी यासाठी काही पदाधिकारी आग्रही होते, मात्र जागा वाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटयाला गेल्याने भाजपा पदाधिकाऱ्यांनी कुरबुर न करता महायुतीचे उमेदवार म्हणून प्रचारामध्ये सक्रीय सहभाग नोंदवत दाते यांना साथ दिली आहे.

# पुण्यात १२ जागांवर अजित पवारांची पळापळ

## भुजबळ, मुंडे, वळसे पाटील मतदारसंघातच अडकले

पुणे :प्रतिनिधी



**मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून अजित पवार बाहेर पडले आणि पक्ष व चिन्ह घेऊन ते यंदा पहिल्यांदाच स्वतंत्रपणे विधानसभेला सामोरे जात आहेत. या कालावधीत त्यांनी पक्षाध्यक्ष म्हणून एकट्याने किल्ला लढविला असून, जिल्ह्यातील पक्षाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी अजित पवार यांनी सर्व ठिकाणी सभा घेऊन नेहमीप्रमाणे प्रचाराची सांगता बारामतीमध्ये केली. छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांना मंतदारसंघातच अडकून पडावे लागले.**

महायुतीत सत्तेत उर्वरीत पान ३ वर

# राज्यातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा- पद्मश्री पोपटराव पवार

हिवरे बाजार : प्रतिनिधी



संवाद पारनेर दर्शन

**बुधवारी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत राज्यातील सर्व मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावून मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले आहे. नोटाला मतदान करणे किंवा मतदानासाठी बाहेर न पडणे या गोष्टींविषयी पवार यांनी चिंता व्यक्त केली आहे.**

यासंदर्भात पारनेर दर्शनशी बोलताना पद्मश्री पवार म्हणाले की,लोकसभा, विधानसभा ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत. या मंदिरात समाज आणि राष्ट्रहिताचे निर्णय होतात. त्यातून आपल्या समाजाला दिशा मिळते. दिवसेंदिवस नोटाला मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या वाढत आहे. त्याबरोबरच मतदानाला न येण्याचेही प्रमाण वाढत असून ही चिंतेची बाब आहे. आपल्या एका मताने मोठे आपल्या राष्ट्राचे, राज्याचे मोठे नुकसान होत असल्याचे पवार यांनी नमुद केले आहे.

भ्रष्टाचार, बेकारी, शेतमालास न मिळणारे भाव,वाढती व्यसनाधीनता व राजकारणातील लोप पावत चाललेला आदर्शवाद यामुळे नाराज होऊन अनेक जण मतदानासाठी बाहेर पडत नाहीत. हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. आपल्या देशाची लोकशाही जगाला सामावून घेणारी आदर्श लोकशाही आहे. कोणत्याही कारणामुळे नाराज असाल तरी सामान्य माणूस पाहून जिथे शक्य तिथे मत दिले पाहिजे. मतदानाचे घटते प्रमाण हे लोकशाहीला घातक आहे. मतदानाचा टक्का वाढला तर जो निवडणूकीचा हेतू आहे तो साध्य होईल. मतदानाचा टक्का वाढला तर मतदान घडवून आणण्यासाठी राज्यकर्त्यांना जी धडपड करावी लागते ती करावी लागणार नाही. कोणत्याही आमिषाला बळी न पडता सर्वांनी निर्भयपणे मतदान करावे. ही लोकशाही त्यातून अधिक बळकट होण्यास मदत होईल असे पवार यांनी या प्रसिध्दीपत्रकात नमुद केले आहे. नितीमुल्ये व राष्ट्रप्रेमाची बैठक निर्माण होण्याची गरज असून

हिवरे बाजारमध्ये कोणत्याही उर्वरीत पान ३ वर



# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विशेष

महाराष्ट्रात सर्व विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीत ईव्हीएम-व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यात एकूण 2 लाख 26 हजार 624 मतदान यंत्र, एकूण 1 लाख 26 हजार 911 कंट्रोल युनिट आणि एकूण 1 लाख 37 हजार 118 व्हीव्हीपॅट यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात एकूण 36 जिल्हे असून 288 जागांवर मतदान होणार आहे. यातील 234 जागा या सर्वसाधारण उमेदवारांसाठी असून, अनुसूचित जमात प्रवर्गासाठी 25 तर 29 जागा या अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत.




२८८ मतदारसंघांत विधानसभा निवडणूक होणार आहे. राज्यात एकूण ४१३६ उमेदवार आहेत. ज्यामध्ये ३७७१ पुरुष, ३६३ महिला आणि अन्य २ उमेदवार आहेत.

## मनुष्यबळ सज्ज

निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मतदार कर्मचारी व अधिकारी पुरविण्यात आले आहेत. पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहे. या मनुष्यबळाचे सरमिसळीकरण करून त्यांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदान केंद्रावर पुरवण्यात येणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी पूर्ण झाली असून त्यांचेही सरमिसळीकरण देखील झाले आहे. संवेदनशील मतदान केंद्रांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (CRPF) तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. मतदान करण्याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. घरोघरी जाऊन वोटर गाईड देण्यात आले आहे. मतदारांना मतदार वोटर स्लिप उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**एकूण 1,00,427 इतक्या मतदान केंद्रांपैकी 67,557 इतक्या मतदान केंद्रांवर वेबकास्टींग प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.**

**आचारसंहिता लागू झाल्यापासून प्रतिबंधात्मक कारवाई केलेल्या व्यक्तींची संख्या 79,856**

- मतदान करण्याकरीता सर्वसाधारण वेळ सकाळी 7 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत आहे. संध्याकाळी 6 वाजता रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना टोकन क्रमांक देऊन त्यांना मतदान करून देण्यात येईल.
- राज्यभरात सी-व्हिजील ॲपवर आचारसंहिता भंगाबाबतच्या 8386 तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील 8353 तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. याकालावधीत एनजीएसपी पोर्टलवरील 13,807 तक्रारीपैकी 9,132 निकाली काढण्यात आलेल्या आहेत.



# चला मतदानाला...

**राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. एकूण 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यातील 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदारांसाठी 1,00,427 मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाची वेळ ही सकाळी 7 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत राहील. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झालेली आहे.**

# राज्यभरात 1 लाखांहून अधिक मतदान केंद्र

**राज्यभरात 1 लाख 427 मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. राज्यात सर्वाधिक मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहे. पुण्यात 8 हजार 462 मतदान केंद्र आहेत. त्यानंतर मुंबई उपनगर येथे 7 हजार 579, ठाणे – 6 हजार 955, नाशिक – 4 हजार 922 तर नागपूर येथे 4 हजार 631 मतदान केंद्र आहेत. निवडणूक आयोगाने शहरी भागातील मतदाराची अनास्था विचारात घेऊन गृहनिर्माण संकुलात मतदान केंद्र उभारली आहेत तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागातील मतदारांना मतदान केंद्राच्या जवळ लवकरात लवकर पोहोचता यावे यासाठी मतदान केंद्राची संख्या वाढवली आहे.**

महाराष्ट्रातील 241 विधानसभा मतदारसंघात मुख्य आणि सहायक मतदान केंद्रांची संख्या निश्चित केली आहे. यंदा राज्यात मुख्य मतदान केंद्र ही 1 लाख 186 असून त्यापैकी शहरी भागात 42 हजार 604 तर ग्रामीण भागात 57 हजार 582 इतकी मतदान केंद्र संख्या राहणार आहे. सहायक मतदान केंद्रांची संख्या 241 इतकी आहेत. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यामुळे मतदारांची सोय आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित होईल. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रात पोहोचता यावे यासाठी बऱ्याच ठिकाणी आवश्यक रॅम्पची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- आदिवासी आणि दुर्गम क्षेत्रावर विशेष लक्ष : यंदाच्या निवडणुकीत आदिवासी मतदारसंघ आणि दुर्गम भागांतील मतदारांसाठी विशेष सुविधा देण्यावर भर दिला आहे. गडचिरोली, गोंदिया, नंदुरबार, धुळे, आणि अमरावती जिल्ह्यात जेथे आदिवासी आणि दुर्गम भाग आहेत तेथे मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने मतदार सुविधांमध्ये सुधारणा केली आहे, जसे की मतदार सहाय्य केंद्रे, मतदार हेल्पलाईन, आणि सूचना फलक यांचा समावेश आहे. तरुण मतदार, महिला मतदारांना लक्षात ठेवून हे उपाय योजले आहे.
- सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्येही मतदान केंद्र : शहरी भागांमध्ये जसे की मुंबई, पुणे, ठाणे सारख्या शहरामध्ये अतिउंच इमारती आणि सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये 1 हजार 181 मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहे. तसेच झोपडपट्टीमध्ये 210 मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहे.
- नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता : निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेला अधिक सुलभ आणि पारदर्शक बनवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये मतदार आपले मतदान केंद्र शोधण्यासाठी ऑनलाइन पोर्टल आणि मोबाइल ॲप्स वापरू शकतात. मतदार जागरूकता मोहिमेंतर्गत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मतदारांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील.




## मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

**मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे, अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे.**

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे. एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे.

# राज्यात ९.७ कोटी मतदार

विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघांतील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे. पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

### ५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख ५ हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत. बुलडाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.




### ४.६९ कोटी महिला मतदार

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

## पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत. गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

## राज्यातील एकूण मतदानकेंद्राचा दृष्टीक्षेप

| | | | |
|---|---|---|---|
| पुणे : 8462 | संभाजीनगर : 3273 | बुलडाणा : 2288 | धाराशिव : 1523 |
| मुंबई उपनगर : 7579 | सातारा : 3165 | पालघर : 2278 | नंदुरबार : 1434 |
| ठाणे : 6955 | नांदेड : 3088 | लातूर : 2143 | वर्धा : 1342 |
| नाशिक : 4922 | रायगड : 2820 | चंद्रपूर : 2077 | गोंदिया : 1285 |
| नागपूर : 4631 | अमरावती : 2708 | अकोला : 1741 | भंडारा : 1167 |
| अहमदनगर : 3765 | यवतमाळ : 2578 | रत्नागिरी : 1747 | वाशिम : 1100 |
| सोलापूर : 3738 | मुंबई शहर : 2538 | जालना : 1755 | हिंगोली : 1023 |
| जळगाव : 3683 | सांगली : 2482 | धुळे : 1753 | गडचिरोली : 972 |
| कोल्हापूर : 3452 | बीड : 2416 | परभणी : 1623 | सिंधुदुर्ग : 921 |

**एकूण : 1,00,427 मतदान केंद्र**

## २ लाखांहून अधिक शाईच्या बाटल्या



विधानसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी राज्यात सुमारे २ लाख २० हजार ५२० शाईच्या बाटल्यांची तरतूद करण्यात आली आहे. या शाईचे वाटप जिल्हानिहाय करण्यात आले आहे. २८८ विधानसभा मतदार संघांमध्ये १ लाख ४२७ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदार केंद्रासाठी प्रत्येकी २ शाईच्या बाटल्या याप्रमाणे २ लाख ८५४ शाईच्या बाटल्यांची संख्या होते. २ लाख ८५४ शाईच्या बाटल्यांबरोबरच अधिकच्या म्हणून काही अशा एकूण २ लाख २० हजार ५२० शाईच्या बाटल्या, मतदानासाठी आवश्यक ते साहित्य पुरविण्यात आले आहे. मतदारांच्या तर्जनीवर लावण्यात येणारी आणि काही दिवस न पुसली जाणारी ही शाई विशेषरित्या बनवली जाते. मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा सेलिब्रिटींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताची तर्जनी अभिमानाने दाखविली जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य घटक बनली आहे. मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या तर्जनीवर न पुसली जाणारी शाई लावली जाते.

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी एकूण ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये ३ लाख ८४ हजार ६९ पुरुष मतदार, २ लाख ५७ हजार ३१७ महिला दिव्यांग मतदार, तसेच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.**

# ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदार

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत. पुणे येथे ८८ हजार ९३७ दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ४८ हजार ६२६ पुरुष, ४० हजार ३०१ महिला आणि १० तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. पुणे पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ३८ हजार १४९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये २१ हजार ५७३ पुरुष मतदार, १६ हजार ५७३ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. दिव्यांग मतदारांची सर्वात कमी नोंदणी गडचिरोली जिल्ह्यात आहे. येथे ६ हजार ४३ दिव्यांग मतदारांची नोंद आहे. यामध्ये ३ हजार ७१० पुरुष आणि २ हजार ३३३ महिला दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. राज्यात तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १ तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.



# राज्यात ८५ वर्षांवरील १२ लाखांहून अधिक मतदार

या निवडणुकीत ८५ वर्षांहून अधिक वयोगटामधील एकूण १२ लाख ४० हजार ९१९ मतदार आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. ५ लाख ४२ हजार ८९१ पुरुष मतदार तर ६ लाख ९८ हजार २२ महिला मतदार आणि ६ तृतीयपंथी मतदार आहेत.

पुणे जिल्ह्यात ८५ वर्षांवरील वयोगटात सर्वाधिक १ लाख २१ हजार ७६० मतदार आहेत. ज्यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५९ हजार २९७ तर महिला ६२ हजार ४६० आणि ३ तृतीयपंथी मतदार आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्यातील ९२ हजार ८७५ मतदारांमध्ये ४८ हजार २९२ पुरुष तर ४४ हजार ५८३ महिला मतदार आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या ६० हजार २७८ इतकी असून यामध्ये २५ हजार ४२९ पुरुष आणि ३४ हजार ८४९ महिला मतदार आहेत. ८५ वर्षांवरील सर्वात कमी मतदार गडचिरोली जिल्ह्यात असून येथील एकूण ६ हजार ६१३ मतदारांमध्ये २ हजार ५५७ पुरुष तर ४ हजार ५६ महिला मतदार आहेत. राज्यात ८५ वर्षांवरील तृतीयपंथी मतदारांची एकूण संख्या ६ असून यामध्ये ३ मतदार पुणे जिल्ह्यात आणि मुंबई शहर, सातारा तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यात प्रत्येकी एक मतदार आहे.

## शॉर्ट न्यूज

### आगडगावला हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**आगडगाव :** येथील काळ भैरवनाथ जन्मोत्सवानिमित्त (ता. १७) पासून काशिखंड पारायण व हरिणाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रोज कीर्तन तसेच इतर कार्यक्रमांबरोबरच भाविकांसाठी महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.सप्ताहांतर्गत रोज पहाटे काकडा, काशिखंड पारायण, सायंकाळी भजन, हरिपाठ, कीर्तन असे कार्यक्रम होतील. रोज सायंकाळी सात वाजता होणाऱ्या कीर्तनांमध्ये नामांकित महाराज सेवा देणार आहेत.

### ओम सानप जिल्ह्यातून ठरला पहिला खेळाडू

**नगर :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे व पुणे जिल्हा मल्लखांब असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या विभागीय शालेय स्पर्धेत अहिल्यानगर शहराचा खेळाडू ओम घनः श्याम सानप यांने उत्कृष्ट कामगिरी करून पुणे विभागात १९ वर्ष वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. या विभागीय स्पर्धेत पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर व अहिल्यानगर शहर आणि ग्रामीणच्या संघांनी सहभाग नोंदवला होता. पुण्याची मक्तेदारी मोडीत काढून प्रथम क्रमांक मिळविणारा ओम अहिल्या जिल्ह्याचा पहिला खेळाडू ठरला आहे.

### मुलीस पळविणाऱ्या आरोपीस अटक

**कोपरगाव :** अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेणाऱ्या आरोपीस कोपरगाव शहर पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्यात आरोपीस मदत करणाऱ्या त्याच्या आई, बहीण व मेहुण्यास पोलिसांनी सहआरोपी केली आहे. त्यांनी मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनदेखील आरोपीस मदत केली होती. शहरातील एका चौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीस दि. २१ ऑक्टोबर रोजी घराजवळून अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याप्रकरणी कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### गौरी शुगर जिल्ह्यात नंबर एकचा भाव देणार

**श्रीगोंदा :** गौरी शुगर साखर कारखान्याला रिफायनरी सिस्टीम आहे. त्यामुळे चांगल्या दर्जाची साखर तयार करता येते. या गाळप हंगामात १० लाख मे टन उसाचे गाळप करुन अहिल्यानगर जिल्ह्यात नंबर एकचा भाव देणार आहे अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांनी हिरडगाव येथे बोलताना केले. गौरी शुगरचा सोमवारी गाळप हंगाम शुभारंभ बाबुराव बोत्रे पाटील व रेखा बोत्रे पाटील यांच्या हस्ते करण्यात

### वडाळा महादेव येथे कारचा भीषण अपघात

**श्रीरामपूर :** नेवासे महामार्गावर वडाळामहादेव येथे कारच्या झालेल्या भीषण अपघातात तरुण ठार झाला. सागर खेत्री असे ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. या अपघातात एकजण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मयत सागर याचा भाऊ व कार चालक आकाश खेत्री हा गंभीर जखमी झाला. सोमवारी मध्यरात्री ही घटना घडली. अपघातात कारचे मोठे नुकसान झाले. कार रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला झाडांमध्ये आदळली. सकाळी कार पाहण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

# प्रा. गाडेकर यांच्या शास्त्रीय संगीताने कोकणकर मंत्रमुग्ध!

## तळेखोल व आचरा येथे मैफीलीचे आयोजन




शिरूर : प्रतिनिधी

**शिरूर (पुणे) येथील प्रा. केशवराव गाडेकर यांच्या तळेखोल (दोडामार्ग) आणि आचरा येथील शास्त्रीय संगीताच्या मैफलीमध्ये संगीत रसिक मंत्रमुग्ध झाले. दोन्ही ठिकाणी मैफलींना रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.**

मालवणी बोली अभ्यासक प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत यांनी या मैफलींचे आयोजन केले होते. प्रा. गाडेकर शिरुर येथील सी. टी. बोरा महाविद्यालयात मानसशास्त्र विभागाचे प्रमुख असुन ते संगीत अलंकार परीक्षेत देशात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. मुंबई, पुण्यासह अनेक ठिकाणी त्यांच्या मैफली झाल्या आहेत. श्री. चंद्रकांत निगडे (पुणे) यांनी हार्मोनियमवर, तर श्री. अशोक मोरे यांनी तबल्यावर साथ केली.

तळेखोल येथे गायनाचार्य रामकृष्ण बुवा वझे स्मृती संगीत संस्थेच्या वतीने अध्यक्ष गंगाराम विष्णू वझे यांच्या हस्ते प्रा. केशवराव गाडेकर यांचा व सहकारी अशोक मोरे, चंद्रकांत निगडे यांच्या शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह देऊन देऊन सत्कार करण्यात आला.

मनोज वझे व डॉ . बाळकृष्ण लळीत यांनी सूत्रसंचालन केले. तळेखोल येतील श्री. गणपत गवस, श्री. उत्तम गवस व ग्रामस्थानी विशेष सहकार्य केले. या संगीत सभेला मोठ्या संख्येने संगीत रसिक उपस्थित होते . संगीत कार्यक्रमापूर्वी वझरे येथील स्मृती स्मारकातील वझेबुवांच्या अर्धपुतळ्याला प्रा. गाडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रम आयोजनासाठी मनोज वझे यानी विशेष परिश्रम घेतले.

तळेखोल येथील कार्यक्रमात राग अहिरी तोडी मध्ये निस दिन तेरो ध्यान धरत हूँ ही विलंबित एकतालमधील आणि हरि हरि नाम जप लो मनुवाँ ही द्रुत तिनताल मधील या प्रमाणे दोन बंदिशी प्रा. गाडेकर यांनी सादर केल्या. घेई छंद मकरंद, प्रिय हा मिलिंद हे कट्यार काळजात घुसली या नाटकातील पद सादर केले. आवडे देवाशी तो ऐका प्रकार ही एकनाथ महाराजांची रचना आणि तुज विन कोणा शरण जाऊ नारायणा ही संत तुकाराम महाराजांची रचना हे दोन अभंग सादर केले. त्यानंतर श्रोत्यांनी केलेल्या आग्रहास्तव काटा रुते कुणाला आणि हे सुरांनो चंद्र व्हा ही दोन गीते सादर केली. शेवटी भैरवीमध्ये बैरन निंद कहासे आयी हे संत कबीर महाराजांचे पद सादर केले.

आचरा येथील श्री देव इनामदार रामेश्वर मंदिरातील मैफलीची सुरुवात राग यमन मध्ये सुमिरन करू मैं तोरा, तु साहेब मेरा ही विलंबित एकतालमधील बंदिश आणि चंद्रमा ललाट पर सोहे भुजंग गर व दरशन दो शंकर महादेव या दोन बंदिशी अनुक्रमे झपताल आणि तिनताल मध्ये सादर केल्या. राग गावती मध्ये डिम डिम डिम डमरू डिमक बाजे ही रूपक तालातील आणि साजन आए मोरे द्वार सखी री ही तिनताल मधील अशा दोन बंदिशी सादर केल्या. त्यानंतर जन्म वाया का दौडा रे, एका विठ्ठला शरण जा रे हे संत नामदेव महाराजांचे पद आणि ओम नमो ज्ञानेश्वरा, करूणा करा दयाळा हे संत एकनाथ महाराजांचे पद सादर केले.

घेई छंद मकरंद प्रिय हा मिलिंद हे कट्यार काळजात घुसली या नाटकातील पद सादर केले. शेवटी बैरन निंद कहासे आयये हे संत कबीर महाराजांचे पद भैरवीमध्ये सादर केले. इनामदार देव रामेश्वर चरणी त्रिपुरी पौर्णिमेला प्रा. गाडेकर यांनी केलेल्या संगीत सेवेपुर्वी संस्थानच्या वतीने श्री. कपिल गुरव यांनी शाल, श्रीफळ व प्रसाद देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी घुंगुरकाठीचे श्री. सतीश लळीत, साहित्यिक श्री. सुरेश ठाकुर, श्री. मंदार सांबारी व अन्य शास्त्रीय संगीत चाहते उपस्थित होते.

# विनोद तावडेंनी पैसे वाटल्याचे आरोप फेटाळले

## मी ४० वर्षांपासून राजकारणात । कुणी काहीही आरोप केले तरी मला फरक पडत नाही

नालासोपारा : प्रतिनिधी

**नालासोपारा येथील एका हॉटेलमध्ये भाजपचे नेते विनोद तावडे यांना पैसे वाटत असताना बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडले असल्याचा दावा बहुजन विकास आघाडीचे नेते व उमेदवार क्षितिज ठाकूर यांनी केला आहे. तसेच यावेळी हॉटेलमध्ये भाजपचे उमेदवार राजन नाईक हे देखील उपस्थित होते. क्षितिज नाईक यांनी जेव्हा हॉटेलचा तपास केला तेव्हा अनेक खोल्यांमधून लाखांच्या घरात पैसे सापडत होते. यानंतर हितेंद्र ठाकूर यांच्या सांगण्यानुसार विनोद तावडे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी विनोद तावडे यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. तसेच पत्रकार परिषद मध्येच थांबवण्यात आली, यावेळी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद थांबवण्यास सांगितल्याचे हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.**

विनोद तावडे यांच्याकडील डायरीमध्ये लाखोंच्या संख्येत प्रत्येकाला पैसे वाटल्याचे नमूद करण्यात आले असल्याचे ठाकूर यांनी दाखवले. तसेच हॉटेलच्या एकाच खोलीतून जवळपास ९ लाख रुपये सापडले होते. विनोद तावडे यांना रंगेहाथ पकडल्यानंतर बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी हॉटेलमध्ये विनोद तावडे यांना घेरले होते. त्यानंतर हितेंद्र ठाकूर व क्षितिज ठाकूर यांनी हे पैसे कोणाला वाटले असा सवाल करत विनोद तावडे यांना घेरले होते. क्षितिज ठाकूर यांनी दावा केला की, तावडे यांच्याकडे ५ कोटी रुपये आणि नावे असलेल्या दोन डायरीही सापडल्या आहेत.

येथील उमेदवार राजन नाईक यांनी विनोद तावडे यांना मतदानाचा टक्का कसा वाढवला जाईल यासाठी बैठकीला बोलावले असल्याचे सांगितले आहे. मात्र हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे सापडले असल्याने नेमका प्रकार काय आहे, याबद्दल अजूनही लोकांमध्ये संभ्रम असल्याचे दिसत आहे. पत्रकार परिषदेत देखील विनोद तावडे यांनी स्पष्टीकरण दिले नाही. आता यावर पुढे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.



विनोद तावडे म्हणाले, या हॉटेलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. मी येत असताना इथे बैठक सुरू होती की निवडणूक दिवशी काय असते त्यावर बोलणं सुरू होते. यावेळी सगळ्यांना भेटलो आणि निघणार होतो. तेवढ्यात बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते आले आणि त्यांना वाटले की पैसे वाटप सुरू आहे. निवडणूक आयोगाने माझी गाडी तपासली, माझी रूम तपासली आणि मी ४० वर्ष झालो राजकारणात आहे, मी कधी निवडणुकीत पैसे वाटलेच नाहीत, असे तावडे म्हणाले. कोणीही काही हितेंद्र ठाकूर म्हणाले, निवडणूक आयोगावर प्रशासनाचा दबाव आहे. माझ्यावर कोणाचा दबाव नाही, मात्र निवडणूक आयोगावर प्रशासनाचा दबाव आहे हे निश्चित आहे. माझी इथे कसली दादागिरी नाही. जे पैसे सापडले ते काय माझे होते? ४८ तासांआधी मतदारसंघातून जायचे असते, तरी ते थांबले कसे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

(पान १ वरून)

## राज्यातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा- पद्मश्री पोपटराव पवार

उमेदवाराची मदत न घेता स्वयंप्रेरणेने मतदान केले जाते. हिवरे बाजारचे सर्वांनी अनुकरण करावे. जगापुढे तापमान वाढीचे मोठे संकट आहे. कारण तापमानबदलाचे दुरगामी परिणाम हेहे कृषी व ग्रामविकासावर होत आहेत त्यातून मानवी अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.अशा प्रसंगी लोकशाहीचे मंदिरे बळकट होण्याची गरज आहे.तरच राष्ट्र व समाजहिताचे निर्णय व त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊ शकते गेली ३० वर्षे हिवरे बाजारमध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन करत आहोत.निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आलेले लोकप्रतिनिधी तापमान वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर मात करण्यासाठी घ्यावयाच्या निर्णयांचे माध्यम होऊ शकतात. महाराष्ट्र राज्य हे देशाला दिशा देणारे राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यात राबविण्यात आलेली धोरणे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गेले आहेत. त्यासाठी मतदान होणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

## पुण्यात १२ जागांवर अजित पवारांची पळापळ

सहभागी झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या गटाला चांगलाच धक्का बसला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीला ५८ जागांवर उमेदवार उभे करण्यात आले. त्यामुळे या ठिकाणी स्टार प्रचारक म्हणून अजित पवार यांनाच पळावे लागले. स्वतःच्या मतदारसंघात प्रचाराच्या शुभारंभाची सभा झाल्यानंतर अजित पवार यांना सर्व ठिकाणी फिरावे लागले.

अजित पवार यांच्या स्थानिक स्तरावरील पक्षाच्या यंत्रणेने मात्र झोकून देत काम केले. स्थानिक सर्व आमदारांनी त्यांची सर्व शक्ती पणाला लावली; तसेच काही ठिकाणी महायुतीतील इतर घटक पक्षांनी हरतऱ्हेची मदत केली. पुणे जिल्ह्यातील शिरूर वगळता इतर सर्व ठिकाणचे आमदार अजित पवार यांच्यासोबतच राहिल्याने सर्वांनीच तगडी प्रचार यंत्रणा राबवत कुठेही कमी पडणार नाही, याची काळजी घेतली.

दादाच ठरले स्टार प्रचारक

गेल्या वेळी विधानसभा निवडणुकीवेळी राष्ट्रवादी एकत्रित असताना प्रचारासाठी अजित पवार यांच्यासह शरद पवार, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, जयंत पाटील आदी नेते सभा घेत होते. मात्र, उमेदवारांसाठी जिल्ह्यात दादांशिवाय खासदार सुनेत्रा पवार, अमोल मिटकरी, पार्थ पवार, जय पवार, तसेच रुपाली चाकणकर यांच्याशिवाय अन्य नेते फिरकू शकले नाहीत. मुंडे, भुजबळ यासारखी मुलुखमैदानी तोफ असलेल्या नेत्यांना त्यांच्याच मतदारसंघात अडकून ठेवण्यात विरोधकांना यश आले आहे.

# आळेफाटा पोलिसांसाठी कर्मचारी वसाहत नाही

## पोलिस ठाण्यात अपुरे मनुष्यबळ । छोट्या खोलीतून चालतोय पोलिस ठाण्याचा कारभार

जुन्नर : प्रतिनिधी




**दिवसभरात ५५० गाड्यांचे सुमारे १०५ थांबे, पिंपळवडी ते आळेखिंड, वडगाव आनंद ते व्हरुडी, मंगरूळ ते नळावणे दरम्यानची तब्बल ४२ किलोमीटरची विस्तीर्ण हद्द, दररोज दाखल होणारे गुन्हे, गेल्या तीस वर्षांपासून पोलिस कर्मचारी संख्येत वाढ नाही, महिला कोठडीही नाही, गुन्ह्यांचा तपास व दररोजची ड्युटी यात भरडले जाणारे पोलिस कर्मचारी, गुन्ह्यात हस्तगत केलेला माल ठेवण्यासाठी नसलेली स्वतंत्र खोली आणि हा सारा कारभार हाकण्यासाठी मिळालेली एक छोटीशी खोली अशी जर्जर अवस्था सध्या आळेफाटा पोलिस ठाण्याची झाली असल्याचे पहावयास मिळत आहे.**

आळेफाटा परिसरात गुन्हेगारीत अलीकडे मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असली, तरी आळेफाटा पोलिस ठाण्याच्या समस्या मात्र जैसे थे असल्याचे दिसून येत आहे. या समस्यांचा सामना करीत सेवा बजावणारे येथील पोलिस कर्मचारी कामाच्या भाराने मेटाकुटीस आले आहेत. आळेफाटा पोलिस ठाण्याला लागलेले समस्यांचे ग्रहण आजही कायम आहे. राज्याच्या गृह खात्याला या पोलिस ठाण्याच्या सक्षमीकरणाचा जणूकाही विसरच पडला असल्याचे चित्र सध्या दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात एका छोट्याशा खोलीतून सुरू झालेला या पोलिस ठाण्याचा कारभार अनेक पटींनी वाढूनही आजही त्याच छोट्याशा खोलीतून सुरू आहे.

या पोलिस ठाण्यात सन २०१६ सालापासून पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या साठ वाढवण्याची आवश्यकता असतानाही अद्याप ती वाढवण्यात आलेली नाही. त्यामुळे अवघ्या पंचेचाळीस मनुष्यबळ व जागेच्या कमतरतेमुळे या पोलिस ठाण्याच्या कामकाजावर परिणाम झाला आहे. आळेफाटा पोलिस ठाण्यात महिलांसाठी ड्रेसिंग रूमची सुविधाही उपलब्ध झालेली नाही. पुरेसे कर्मचारी उपलबध व्हावेत व जागेची अडचण सोडविण्यात यावी, यासाठी स्थानिक अधिकारी वरिष्ठ कार्यालयांकडे लेखी विनंती दरवर्षी करीत आलेले आहेत. मात्र, त्याकडे दुर्लक्षच करण्यात येत असल्याची स्थिती आहे. आळेफाटा पोलिस ठाण्यात सध्या महिला कोठडी नाही.

# महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी मतदान

## भाजप १४९ जागी, काँग्रेसची १०१ जागांवर लढत ■ ६ मोठ्या पक्षांसह १५८ पक्ष रिंगणात

मुंबई : प्रतिनिधी




**महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर एकूण १५८ पक्ष निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी ६ मोठे पक्ष दोन आघाड्यांचा भाग म्हणून निवडणूक लढवत आहेत.**

शिंदे गटातील शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस हे भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील महाआघाडीचा भाग आहेत. तर काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना (उबाठा) आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) हे महाविकास आघाडीचा भाग आहेत.

गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेची युती झाली होती. तेव्हा भाजपने १०५ , तर शिवसेनेने ५६ जागा जिंकल्या होत्या. तर काँग्रेसला ४४, तर राष्ट्रवादीला ५४ जागा मिळाल्या आहेत. भाजप-शिवसेना सहज सत्तेवर येऊ शकले असते, पण युती तुटली.

सर्व राजकीय गोंधळानंतर २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, मात्र बहुमत चाचणीपूर्वीच २६ नोव्हेंबरला दोघांनाही राजीनामा द्यावा लागला.यानंतर २८ नोव्हेंबर रोजी शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले. उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. सुमारे अडीच वर्षांनंतर शिवसेनेत, तर वर्षभरानंतर राष्ट्रवादीत बंडखोरी होऊन दोन्ही पक्ष चार पक्षांत विभागले गेले. या राजकीय पार्श्वभूमीवरच लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षांना आघाडी मिळाली.

# वाकडी टिकली लावलेले स्वतःला धर्माचे रक्षक मानतात

## कालिचरण महाराजांच्या टिकेला मनोज जरांगे यांचे प्रत्युत्तर

जालना : प्रतिनिधी

**वाकडी टिकली लावलेले स्वतःला धर्माचे रक्षक मानतात. पण धर्माची खरी रक्षक जनता आहे,असे वक्तव्य करत मनोज जरांगे यांनी कालिचरण महाराजांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. जनता स्वतः च्या अंगावर वार सोसते. हे टिकली लावणारे संत फक्त सुपाऱ्या, नारळ, पैसे घेऊ शकतात. खरा हिंदू धर्म वारकरी, गरीब जनता चालवत आहे. हरळ खाऊन जगणारे लोक धर्माचे ठेकेदार नाहीत. मराठा कट्टर हिंदू आहे आणि राहणारच'',असेही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.**

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मी साधू-संताचा आदर करतो.तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुत्व मानतो. माझ्याबद्दल जे बरळत आहेत, त्यांना बरळू द्यावे. कारण ज्याने एका पक्षाचा ठेका घेतला आहे, अशांबद्दल आपण काही बोलले नाही पाहिजे. संत-महात्म्यांचा आदर करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवले आहे. आम्ही ज्या हिंदू धर्मात आहोत, त्यातील सर्वात कट्टर वर्ग आहे मराठा समाज. पण हाच समाज आज अडचणीत आलेला आहे,असं वक्तव्य त्यांनी केले.

स्वयंघोषित कालीचरण महाराज यांनी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित केलेल्या एका धार्मिक सभेत मराठा आरक्षणासाठी



आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्यावर वादग्रस्त टिप्पणी केली होती. त्यांच्या वादग्रस्त टिप्पणीनंतर संताप व्यक्त करण्यात येत आहे.ज्यांच्या मतदारसंघात हा कार्यक्रम झाला त्या संजय शिरसाट यांनी यावर भूमिका मांडली असून त्यांनी कालीचरण यांच्या टिप्पणीपासून हात झटकले आहेत.

संजय शिरसाट म्हणाले, माझ्या मतदारसंघात कालीचरण यांची जी सभा झाली, त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही. मी त्यांना भेटलेलो नाही किंवा त्याठिकाणी माझा बॅनर लागलेला होता. पण माझे नाव सभेशी जोडले गेल्यामुळे गैरसमज निर्माण होत आहे. जरांगे पाटील आणि माझ्यात जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या आंदोलनात पहिल्या दिवसांपासून आम्ही त्यांना सहकार्य करत आलो आहोत. मराठा समाजामध्ये गैरसमज झाला तर त्याचा परिणाम वाईट होतो. याची जाणीव मला असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘टीम राणीताई’ ना थकली, ना थांबली !

■ १६१ गावांमध्ये प्रचाराच्या तीन फेऱ्या ■ गावागावांमधील उत्स्फूर्त स्वागताना भारावल्या राणी लंके ■ प्रचाराच्या समारोपाप्रसंगी लंके यांच्या डोळयात अश्रू

पारनेर, नगर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्यासोबत आलेली टीम मतदारसंघातील १६१ गावांमध्ये प्रचाराच्या तीन फेऱ्या पुर्ण करताना कधी ना थकली ना थांबली. अविरतपणे महिनाभर या टीमने राणी लंके यांना साथ देत प्रचाराचा धुरा समर्थपणे सांभाळली. स्वतः उमेदवार असल्याप्रमाणे प्रचार करणाऱ्या या सहकाऱ्यप्रती प्रचाराच्या समाप्तीप्रसंगी कृतज्ञता व्यक्त करताना राणी लंके यांच्या डोळयात अश्रू उभे राहिले. राणी लंके भाऊक झाल्याने अपसुकच टीममधील इतर सदस्यांच्या डोळयांच्या कडाही पाणावल्या.**

विधानसभा निवडणूकीस प्रारंभ होण्यापूर्वीपासूनच राणी लंके या मतदारसंघातील विविध गावांच्या संपर्कात होत्या. आरोग्य यज्ञ उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी विविध गावांना भेटी दिल्या होत्या. निवडणूकीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच त्यांनी गावागावांना भेटी देत त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. विविध गावांच्या समस्या ऐकूण घेत कधी त्यावर तात्काळ तोडगा काढत तर कधी त्या प्रश्नांची नोंद घेऊन आचारसंहितेनंतर ते प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही लंके या देत होत्या. विविध गावांमधील घोंगडी बैठकांदरम्यान लंके व त्यांच्या सहकाऱ्यांचे पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी, तसेच ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात येत होते. नगर तालुक्यातून सुरू झालेला घोंगडी बैठकांचा सिलसिला पारनेर तालुक्यातील देसवडे या गावामध्ये येऊन थांबला.

घोंगडी बैठकांनंतर राणी लंके यांनी गावभेट दौऱ्याच्या निमित्ताने पुन्हा मतदारांशी संवाद साधला. त्यावेळीही त्यांचे ठिकठिकाणी झालेल्या स्वागताने त्या भाराऊन गेल्या. गावभेट दौऱ्यामध्ये त्या त्या गावांतील राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस तसेच शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होत असत. नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच सदस्यही गावभेट दौऱ्याचे नियोजन करून प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करताना दिसून आले.

गावभेट दौऱ्याच्या यशस्वीतेनंतर राणी लंके यांनी गटनिहाय बैठकांना हजेरी लावत मतदार, पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या गटनिहाय बैठकांनाही मोठा प्रतिसाद लाभला. गटनिहाय बैठक आटोपल्यानंतर लंके यांनी संबंधित गटांतील गावांना भेटी देत प्रचाराच्या नियोजनाची माहीती घेतली. नागरीकांशी संवाद साधत महिला उमेदवाराला मतदार करण्याचे आवाहन केले.

गटनिहाय बैठकांनंतर लंके यांनी विविध गावांमधून रॅली काढत मतदारांना अभिवादन केले. रॅलीदरम्यान चौक सभा, कॉर्नर सभा घेत त्या मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत होत्या. प्रत्येक गावांमध्ये तीन फेऱ्या झाल्याने प्रत्येक गावापर्यंत पोहचणाऱ्या राणी लंके या पहिल्या उमेदवार ठरल्या.



■ प्रचार दौऱ्यादरम्यान जे उपलब्ध असेल ते जेवण करून राणी लंके व त्यांची टीम पुढील गावाकडे मार्गक्रमण करत होती.

## विकास कामांसाठी अग्रणी राहण्याचे ग्वाही

खा. नीलेश लंके यांनी मतदारसंघाच्या विविध गावांमध्ये भरीव विकास कामे माग लावली आहे. परंतू विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने अनेक ठिकाणी विकास कामांबाबत मागणी येत असे. खा. नीलेश लंके यांच्या पावलावर पाऊल ठेऊन आपण विकास कामांमध्ये अग्रणी राहू याची ग्वाही त्या नागरीकांना देत असत. ही ग्वाही देतानाच पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या सदस्य तसेच जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्या म्हणून काम करताना त्यांनी राबविलेली विकास कामे, वैयक्तिक लाभाच्या योजनांचीही त्या आवर्जुन माहीती देत. स्थानिक स्वराज्य संस्था या विधिमंडळात जाण्याचा राजमार्ग दाखवितात हे देखील त्या आवर्जुन सांगत. .

## टीम राणी लंकेचे हे आहेत सदस्य

सुवर्णा धाडगे, राजेंद्र चौधरी, पुनम मुंगसे, मोहन रोकडे, सचिन टकले, भाऊ पावडे, नंदू दळवी, भाऊ चौरे, नीलेश दळवी, सिध्दार्थ दळवी, ऋतीक मुरूमकर, शिवम लंके, साहिल लंके, अक्षदा लंके, पुजा लंके, सागर साठे, शुभम रोकडे, वैभव शिंदे, दत्ता होले, चेतन वाघ, श्रीलेश मेसे, अनिकेत तासकर, प्रतिक रसाळ, गौतम रसाळ, रामदास लोंढे.

## थकवा तरीही उत्साह कायम

उमेदवार राणी लंके या तीस दिवस प्रचारात असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत असे, मात्र त्यांच्यातील उत्साह मात्र एक दिवसही तसुभरही कमी झाल्याचे पहावयास मिळाले नाही. त्यांच्या उत्साह पाहून त्यांच्यासमवेतच्या सहकाऱ्यांमध्येही उर्जा निर्माण होत असे. एका महिलेला प्रथमच विधिमंडळात पाठविण्याच्या लढाईत आपणही सहभागी आहोत याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत असे.

## सकाळी सात ते रात्री बारा

सकाळी सात वाजता हंगे येथील घरातून उमेदवार राणी लंके या बाहेर पडल्यानंतर सकाळी आठ वाजता नियोजित गावामध्ये त्या पोहचत असत. तिथून सुरू झालेला दौरा प्रत्येक गावात नियोजित वेळेपेक्षा अधिक वेळ सुरू राहत असे. त्यामुळे प्रत्येक गावात पोहचण्यास उशीर झाल्याने रात्री बारा वाजेपर्यंत हा दौरा दररोज सुरू राहत असे.

## साधेपणा, सहकाऱ्यांविषयी आत्मियता

दररोजच्या दौऱ्यामध्ये कोणीतरी सहकाऱ्याने भोजनाची व्यवस्था केलेली असे. जे असेल ते आनंदाने खाऊन ही टीम थोडीशी विश्रांती घेऊन पुढील गावाकडे मार्गक्रमण करीत असे. राणी लंके या सोबतच्या सहकाऱ्यांचे जेवण झाले का, कोणी आजारी असेल तर त्यांची किंवा त्यांच्या घरातील सदस्यांची त्या आत्मियतेने चौकशी करत. महिनाभराच्या सहवासामुळे त्यांचे कौटुंबिक नाते तयार झाले होते. मी विधानसभा निवडणूकीतील एका मातब्बर पक्षाची उमेदवार आहे किंवा खासदाराची पत्नी आहे याचा लवलेशही त्यांच्या वागण्यातून पहावयास मिळाला नाही.

## महिलांचा मोठा प्रतिसाद

राणी लंके यांचा अर्ज दाखल करण्यासाठी सुमारे तीस हजारांवर महिलांनी हजेरी लावली होती. त्यानिमित्त झालेल्या पारनेरमधील बाजारतळावरील सभेने या ठिकाणच्या आजवरच्या सभांचा विक्रम मोडला. अर्ज दाखल केल्यापासून राणी लंके यांच्या प्रत्येक दौऱ्यात, सभेत अथवा व्यासपीठावरही महिलांची संख्या लक्षणीय असल्याचे दिसून आले. मतदारसंघाच्या आजवरच्या राजकीय इतिहासात प्रथमच उमेदवारी करणाऱ्या या महिलेच्या पाठीशी महिला भगिनींनी उभे केलेले पाठबळ निश्‍चितच कौतुकास्पद ठरले.

## राणी लंके यांचा मुत्सद्दीपणा

पंचायत समिती, जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून काम करतानाचा गाठीशी असलेल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी त्यांच्या विरोधात असलेल्या काही पदाधिकाऱ्यांना या निवडणूकीत सोबत घेण्याची किमयाही राणी लंके यांनी करून दाखविली. त्यातून त्यांचा राजकीय मुत्सद्दीपणा अधोरेखीत झाला. खा. नीलेश लंके यांची अर्धांगिणी म्हणून त्यांनी लंके यांच्या विविध उपक्रमांना मोठी साथ दिली आहे. एका यशस्वी पुरूषामागे एका यशस्वी स्त्रिचा हात असतो हे राणी लंके यांनी कृतीतून सिध्द केले.

सुवर्णा धाडगे
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी महिला आघाडी

## राणी लंके खा. लंके यांचे कार्य पुढे नेणार

राणी लंके यांच्या दौऱ्यात तीस दिवस सहभागी होण्याचा योग आला. प्रत्येक नागरीकाची आस्थेने चौकशी, त्यांच्या अडचणी समजाऊन घेत त्यांना मदत करण्याची भूमिका, विकास कामांबाबतही सकारात्मक भूमिका घेत खा. नीलेश लंके यांच्या पावलावर पाऊल ठेऊन राणी लंके या विधानसभेच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. खा. नीलेश लंके यांचे विधानसभेतील कार्य राणी लंके या समर्थपणे पुढे नेतील यात शंका नाही.

राजेंद्र चौधरी
मा. पंचायत समिती सदस्य

## नागरीकांचा प्रतिसाद सुखावणारा

राणी लंके यांच्या विविध दौऱ्यांचा आढावा घेतला तर प्रत्येक गावामध्ये त्यांना मिळणारा प्रतिसाद सुखावणारा होता. गेल्या पाच वर्षात खा. नीलेश लंके यांनी केलेली विकास कामे, वैयक्तिक अडचणींमध्ये केलेली मदत याचीच ती पावती होती.

भाऊ पावडे
नीलेश लंके प्रतिष्ठान, नवी मुंबई

# तमनर आखाड्यातील धनगर बांधव आ. तनपुरेंच्या पाठीशी

### विजयराव तमनर यांचा विश्वास



राहुरी : प्रतिनिधी

**राहुरी नगर पाथर्डी मतदार संघाचे उमेदवार आ. प्राजक्त तनपुरे यांच्या जनसंवाद यात्रेस तमनर आखाडा येथील जनतेकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून आमदार तनपुरे यांचे तमनर आखाडा गावात आगमन होताच नागरिकांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत केले.**

चेअरमन गंगाधर तमनर यांनी तमनर आखाडा येथील मुलींना शिक्षण घेण्यासाठी देसवंडी येथे जाण्यासाठी देवनदीतील रस्त्याचा व गावातील मुख्य रस्त्याबाबत प्रश्न मांडला असता त्याठिकाणी येत्या काही काळातच त्या नदीवर पूल बांधण्याचे काम मार्गी लावले जाईल व तमनर आखाडयावरील प्रमुख रस्ते पूर्वीच झाले असते महायुती सरकारच्या आडमुठी धोरणामुळे ही कामे प्रलंबित राहिली असून गतीमान महाविकास आघाडीचे सरकार येताच रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी प्राजक्त तनपुरे यांनी यावेळी दिले.

विजयराव तमनर म्हणाले की आमदार प्राजक्त तनपुरे यांनी धनगर समाज बांधाना प्रत्येक संकटावेळी न्याय देण्याच काम केले तसेच समाज बांधावांच्या प्रत्येक सामाजिक कार्यात ते ठामपणे उभे राहिले व समाजाला मदत केली त्यामुळे राहुरी मतदार संघातील धनगर समाज पूर्ण ताकतीनिशी प्राजक्त तनपुरे यांच्या पाठीशी उभा आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मच्छिंद्र भागवत तमनर हे होते. यावेळी रावसाहेब बाबुराव तमनर, हरिभाऊ तमनर, गंगाधर तमनर, विजयराव तमनर, आप्पासाहेब नारायण तमनर, कोंडाजी तमनर, सावित्रा तमनर, ताराचंद तमनर, भानुदास तमनर सर, दिलीप पंढरीनाथ तमनर, विलास कोपनर, कोंडीराम तमनर, सुरेश तमनर, हिरामण तमनर, विलास बापू तमनर, माजी सरपंच हिरामण तमनर, ताराचंद पाटील तमनर, राजाराम पाटील तमनर, ऋषिकेश तमनर, आण्णासाहेब तमनर, नारायण कोपनर, अथर्व कोपनर, व विकास मंडळाचे कार्यकर्ते संतराम दादा तमनर यांच्यासह मोठ्या प्रमाणात तमनर आखाडा येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# सीनेवरील पुलामुळे दळणवळणाचा प्रश्न मार्गी

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन | आमदारांच्या फोटोला दुग्धाभिषेक करीत अनोखे स्वागत

नगर : प्रतिनिधी

**बोरुडेमळा परिसरातून जाणाऱ्या सीना नदीवर पूल नसल्याने पावसाळ्यात परिसरातील नागरिकांचे हाल होत असे. त्यामुळे हा महत्वाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करत नव्या पुलासाठी निधी मंजूर केला. आता नदीवरील पूल बांधून पूर्ण झाल्याने बोरुडेमळ्यातील शेकडो शेतकऱ्यांचा दळणवळणाचा प्रश्न लावला मार्गी लावला आहे. शहरात विकास कामे करताना स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले आहे.**

त्यामुळे या निवडणुकीत सर्व भागांमधून नागरीकांचे पाठबळ मला मिळत आहे. शहराच्या उज्वल भवितव्यासाठी नगरकरांनी मला पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी प्रभाग आठ मधील बोरूडेमळा परिसरात नगर विकास यात्रा काढून मतदारांशी संवाद साधला. यावेळी या परिसरातील प्रलंबित समस्या सोडवून विकासकामे केल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आ.संग्राम जगताप यांच्या फ्लेक्सच्या फोटोला दुग्धाभिषेक करत अनोख्या पद्धतीने स्वागत करून त्यांचे आभार मानले.






**आपले आमदार हे नामदार होणारच**

बोरूडे मळ्यालगत सीना नदीचे पात्र आहे. नदीपात्राच्या पलीकडे शकडो शेतकऱ्यांची शेत जमीन आहे. नदीवर पूर नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान व मोठ्या प्रमाणात हाल होत असे. मात्र शेतकऱ्यांची व नागरिकांची जाण असलेले आ. संग्राम जगताप यांनी कमी अवधीमध्ये पूल बांधून या परिसराचा ज्वलंत प्रश्न सोडवला आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या मनात समाधान व आ.संग्राम जगताप यांच्या बद्दल मोठी आस्था आहे. त्याच बरोबर सीना नदीचे सुशोभीकरण, बालिकाश्रम रस्त्याचे काँक्रिटीकरण, बोरुडे मळ्यातील सर्व अंतर्गत रस्त्यांची कामे, सुरळीत पाणीपुरवठा, लाईट, ड्रेनेज असे अनेक प्रश्न आ.जगतापांनी मार्गी लावल्यामुळे आपले आमदार हे नामदार होणारच, अशी प्रतिक्रिया परिसरातील सामाजिक कार्यकर्ते संदीप बोरुडे यांच्यासह नागरिकांनी दिल्या.

बोरुडेमळ्या मधील द्वारका नगरी, गंदे माळा, सुडके मळा, लेंडकर मळा, बागडे मळा परिसरातून नगर विकास यात्रा काढून नागरिकांशी आ. संग्राम जगताप यांनी संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक दगडू पवार, संदीप बोरुडे, प्रा.अरविंद शिंदे, राजू कोकणे, गौरव बोरुडे, प्रशांत बोरुडे, सुजित बोरुडे, भरत जाधव, रत्नाकर कुलकर्णी, विजय बोरुडे, दीपक खेडकर, डॉ. एस.टी.देशमुख, गणेश शिंदे, बबलू सुडके, ओमकार बोरुडे, ओमकार लेंडकर, चिंटू आडसुळे, काका शेळके, दत्ता ठाणगे, प्रशांत घाडगे, अक्षय जाधव, सचिन मुदगल, संतोष लांडे, दादा पांडुळे आदींसह परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिसगावच्या बहिणींच्या डोक्यावरील हंडा उतरविल्याचे समाधान

### आ. प्राजक्त तनपुरे यांचे प्रचार सभेत प्रतिपादन



तिसगाव : प्रतिनिधी

**वांबोरी चारी टप्पा दोन असो व एक असो पाथर्डीकरांना नेहमीच न्याय देण्याचे काम केले असून गेल्या पन्नास वर्षापासून चा तिसगावचा पाणी प्रश्न सोडवून आम्ही तिसगावच्या लाडक्या बहिणींच्या डोक्यावरील हंडा उतरवल्याचे समाधान असल्याचे प्रतिपादन आमदार प्राजक्त तनपुरे यांनी केले. तिसगाव ता. पाथर्डी येथे प्रचार सभेदरम्यान ते बोलत होते.**

यावेळी यावेळी तिसगाव चे सरपंच इलीयास शेख सर ,सेवा सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब लवांडे , शिवसेनेचे अनिल रांधवणे , इरशाद शेख तसेच महिला बचत गटाच्या अध्यक्षा शबाना भाभी पठाण यांसह शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख रफीक भैया शेख , उपसरपंच सुनील अकोलकर , गणेश अकोलकर, यांसह मिरीचे महेंद्र सोलाट ,राहुल गवळी एकनाथ झाडे ,भागिनाथ गवळी , आसाराम वीर ,बद्रीनाथ सोलाट, नंदकुमार कुटे, अमोल वाघ, जालिंदर वामन , तुळशीदास शिंदे ,सागर कराळे ,सतीश शेत्रे, मारुती शेत्रे यांसह विविध गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आ.तनपुरे म्हणाले पाथर्डी तालुक्याच्या दुष्काळी भागातील नालाबांध, तलाव, बंधारे ,दुरुस्त करण्यासाठी कोट्यावधीचा निधी दिला. त्याचप्रमाणे वांबोरी चारी टप्पा दोन साठीही जलसंपदा मंत्री जयंती पाटील यांच्यामार्फत सुमारे १०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. हे करत असतानाच जल जीवन योजनेअंतर्गत मिरी- तिसगाव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेला बळकटी देऊन सुमारे १५० कोटी रुपये मंजूर केले. त्यामध्ये अनेक गावांचा समावेश करून पिण्याच्या पाण्यासाठी त्यांनाही या योजनेत मध्ये समाविष्ट करून घेतले. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे तिसगावचा पाणी प्रश्न होता. वर्षानुवर्षे अनेक वेळा तिसगावकरांना आश्वासन देण्यात आली. मात्र आश्वासना शिवाय पुढे काहीही झाले नाही. आम्ही मात्र मिरी -तिसगाव योजनेअंतर्गत पांढरीच्या पुलापासून तिसगाव पर्यंत स्वतंत्र पाईपलाईन करून तिसगावला पाणीपुरवठा करण्यासाठी विशेष नियोजन केले व तिसगावकरांना मुबलक पाणी दिले. तिसगावच्या लाडक्या बहिणीच्या डोक्यावरील हंडा उतरवण्याचे काम आपण खऱ्या अर्थाने केला असल्यामुळे या भागातून आपल्याला मोठा पाठिंबा मिळत असून याच वहिनींच्या आशीर्वादाने आपण विजय होणार असल्याचे तनपुरे यांनी यावेळी सांगितले.

तिसगावचे सरपंच इलियास शेख म्हणाले की,आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या माध्यमातून तिसगावला कोट्यावधी रुपयाचा निधी आला व अनेक विकास कामे झाली. ५० वर्षापासून रखडलेला पिण्याचा पाण्याचा प्रश्न आ.तनपुरे यांनीच मार्गी लावला आणि म्हणून तिसगाव मधून मोठे मताधिक्य त्यांना मिळवून देणार असल्याचे सांगितले.

# बालवारकऱ्यांच्या उभ्या रिंगणात रमले आ. जगताप !

### भक्तिमय वातावरणात आ. संग्राम जगताप यांच्या प्रचाराचा सांगता

नगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप मंगळवारी बालवारकऱ्यांच्या उभ्या रिंगणात टाळ, मृदुंग वाजवत वारकऱ्यांसमवेत ठेका धरत रममाण झाले होते. मोठया भक्तिमय वातावरणात आ. जगताप यांच्या प्रचाराचा उत्साहात सांगता झाली.**



इस्त बेहस्त महाल ते भिस्तबाग चौकापर्यंत आ. जगताप यांची प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी या प्रचार फेरीचे स्वागत केले. फेरीच्या अग्रभागी बाल वारकरी टाळ मृदुंग वाजवत विठू नामाचा जयघोष करत सहभागी झाले होते. बालवारकऱ्यांचा लयबध्द ठेका पाहून आ. संग्राम जगताप यांनाही त्यांच्यात सहभागी होण्याचा मोह आवरला नाही. त्यांनीही गळयात टाळ घेत, मृदुंग वाजवत वारकऱ्यांनी तयार केलेल्या उभ्या रिंगणात ते रमले.

यावेळी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष, मा. नगरसेवक संपत बारस्कर, मा. नगरसेविका मीना चव्हाण, दिपाली बारस्कर, डॉ. सागर बोरूडे, उपनगर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष शिवाजीराव चव्हाण, किरण बारस्कर, प्रशांत निमसे, सुनील डोंगरे, अंकुश बोरूडे, सचिन बारस्कर नितीन बारस्कर, शरद बोरूडे, प्रशांत भालेराव, सतीश ढवन, विलास ढवन, स्वप्निल ढवन, हभप खोसे महाराज यांच्यासह परिसरातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

## स्वागताने भारावले आ. जगताप

यावेळी धनगर समाजाच्या वतीने काठी, घोंगडी भेट देत, भंडाऱ्याने मळवट भरून सत्कार करण्यात आला. प्रचार फेरीदरम्यान ठिकठिकाणी आ. जगताप यांचे जेसीबीमधून पुष्पवृष्टी करीत स्वागत करण्यात येत होते. पारंपारीक फेटे परिधान केलेल्या अडीचशे भगिनींनी औक्षण करीत आ. जगताप यांचे औक्षण केले. परिसरातील नागरिकांनी केलेल्या अनोख्या स्वागताने आ. जगताप हे भारावून गेले होते.

## विक्रमी मताधिक्क्याने विजयी होणार

या निवडणूकीमध्ये आ. संग्राम जगताप यांनी पहिल्या दिवसापासून आघाडी घेतली आहे. आ. जगताप यांच्या सहकाऱ्याने प्रभाग एकमध्ये मोठया प्रमाणावर झालेल्या विकास कामांमुळे नागरिकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न माग लागले आहेत. शहरातील सर्व प्रभागांमध्ये केलेल्या विकास कामांमुळे आ. जगताप यांचा विजय निश्चित असून आजवरच्या सर्व निवडणूकांचे रेकॉर्ड ब्रेक करीत ते विक्रमी मताधिक्क्याने विजयी होणार आहेत.

संपत बारस्कर, मा. नगसेवक

## आ. जगताप यांना मंत्रीपदाची संधी हवी

विकास कामांच्या माध्यमातून कार्यसम्राट आमदार अशी उपाधी लाभले ल्या आ. संग्राम जगताप यांचे स्वागत करण्यासाठी प्रभाग १ मधील महिला मोठया उत्साहाने रस्त्यावर उतरल्या आहेत. नगर शहराला नवस्वरूप प्राप्त होण्यासाठी आ. जगताप हे विजयी झाल्यानंतर त्यांना मंत्रीपदाची संधी मिळावी.

मीना चव्हाण, मा. नगरसेविका

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com